(36)

नि . ८

# BEFORE THE LOK ADALAT

HELD AT. 14/03/2026 AHMEDPUR

R.C.S.No. 129 /2026

वादी

(Organised by TLSC AHMEDPUR Authority T.L.S.C. Committiee Under Section 19 of The legal Services Authorties Act] 1987 (Central Act.)

Petitioner /Plaintiff /Complainant :- दस्तगीर पिता बाबनसाब शेख मंगरुळे,
वय ५० वर्षे, धंदा- शेती.
रा. पाटील गल्ली, शिरुर ताजबंद, ता. अहमदपूर

प्रतिवादी

विरुध्द

बाबनसाब

Defendant /Respondent :- बाबनसाब पिता सरवरसाब मंगरुळे,
वय ८५ वर्षे, धंदा- शेती.
रा.पाटील गल्ली,शिरुर ताजबंद,ता.अहमदपूर
जि.लातूर.

Identified by
Adv. R.V. Gaikwad

No of Proceedings of the RCS No. 129/2026 Court/ Authority Committiee

Present -

Name of Judicial Officer - Shri. S.N. Sarde.

Retired Judicial Officer -

Name of Memders - 1) Adv. P.M. Gaikwad.
2)

AWARD

The dispute between the parties having been referred for determinantion to the Lok Adalat and the parties having compromised /setteled the case / matter, the following award is passed in terms of the settelement .

१) हे की, मौजे शिरुर ताजबंद, ता अहमदपूर, जि. लातूर येथील जमीन भु. क्र. १९२ मधील क्षेत्र २ हे. ७० आर आकार ३ रुपये ५९ पैसे जमीनीचा प्रतिवादी हा मालक व कब्जेदार होता, ज्याची चतु:सिमा खालील प्रमाणे आहे.

Scanned with OKEN Scanner

पूर्वेस :- महेताब मंगरुळे, चाँद मंगरुळे व गोपाळ मोरे यांच्या जमीनी व १२ फुट रुंदीचा रस्ता.

पश्चिमेस :- विक्रम गोविंद सारोळे यांची जमीन,

दक्षिणेस :- चंदु पडोळे, वामन पडोळे व १२ फुट रुंदीचा रस्ता,

उत्तरेस :- माडणी शिव.

येणे प्रमाणे चतु:सिमेच्या आतील जमीन ही प्रतिवादीने वादीस ३१ मार्च, २०२५ रोजी साक्षीदार नामे १) शेख गौस गुलाम दस्तगीर, रा. शिरुर ताजबंद. ता. अहमदपूर जि. लातूर २) गुलाब आमीर हामजा पठाण, रा. अहमदपूर, ता. अहमदपूर, जि. लातूर यांचे समक्ष तोंडी हिब्बा मौजे शिरुर ताजबंद, ता. अहमदपूर येथे दिलेला आहे. तेंव्हापासून वादी हा सदरील दावा जमीनीवर मालक कब्जेदार म्हणून काबीज आहे.प्रतिवादीने वादीच्या असलेल्या जिव्हाळयाचे नाते संबंधामुळे सदर हिब्बा हा विना मोबदला वादीस दिलेला आहे. तसेच प्रतिवादीने नशापाणी न करता सदर हिब्बा हा वादीचे हक्कात दिलेला आहे व तो वादीने त्याच दिवशी पंचासमक्ष स्विकारला आहे हे वादी व प्रतीवादी यांना मान्य व कबुल आहे.

२) हे की, प्रतिवादीचा वादग्रस्त दावा मिळकतीशी कांही एक सबंध राहिलेला नाही, परंतू प्रतिवादी हा लोकांचे व नातेवाई कांचे चिथावणीवरुन वादीचे कब्जेचे जमीनीमध्ये अडथळा, हस्तक्षेप अडकाठी करुन सदर जमीन हस्तांतर करण्याची व वादीस बेदखल करण्याची धमकी दि. २०/२/२०२६ रोजी मौजे शिरुर ताजबंद, ता. अहमदपूर, जि. लातूर येथे दिली व तृतीय पक्षकाराचे हित संबंध व अधिकार प्रस्थापीत करण्याच्या प्रयत्नात आहे. म्हणून वादीचा दावा जमीनीचा मालकी हक्क जाहीर करण्यात यावा व प्रतिवादी विरुध्द कायमचा मनाई हुकूम देवून रोकण्यात यावे. अन्यथा वादीचे अतोनात नुकसान होनार असून, अनेक वादांना तोंड दयावे लागणार आहे. म्हणून वादी हा प्रतिविादी विरुध्द सदरचा दावा देण्यास पाञ असून, प्रतिवादी हा त्याचा जवाब देण्यास जवाबदार आहे.

Scanned with OKEN Scanner

म्हणून दि. २०/२/२०२६ रोजी वादीस प्रतिवादी विरुध्द दावा देण्याचे कारण उद्‌भवले.

३) हे की, सदरील तडजोडीनुसार तोंडी हिब्बा अधारे आलेल्या जमीनीचा मालकी कब्जेचा अंमल वादी आपले नावे ७/१२ ला अंमल करुन घेतील त्यास प्रतिवादीचा कोणत्याही प्रकारचा उजर आक्षेप घेणार नाही हे वादी व प्रतिवादी यांना मान्य व कबुल आहे.

The parties are informed that the court fee, if any, paid by any of them shall be refunded

Petitioner /Plaintiff /Complainant -

**दस्तगीर पिता बाबनसाब शेख मंगरुळे,**
रा. पाटील गल्ली, शिरुर ताजबंद,
ता. अहमदपूर

**ॲड. पी.ए.कांबळे,**
अहमदपूर

Defendant /Respondent

**बाबनसाब पिता सरवरसाब मंगरुळे,**
रा. पाटील गल्ली, शिरुर ताजबंद,
ता. अहमदपूर.

**ॲड.**
अहमदपूर.

Head Of Panel

Member

Member

Date -14/03/2026

(Seal of the Authortity /Committee)

Scanned with OKEN Scanner